श्री. प्रकाश बा. मिसाळ, मुख्य अभियंता (स्थापत्य) यांना प्रतिनियुक्तीवरुन विभागात रुजू झाल्यानंतरची पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
**शासन आदेश क्रमांकः एलटीएस १३२२/(३२८/२०२२)/आ (वर्ग-१)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
**दिनांक : ०१ फेब्रुवारी, २०२३.**

**संदर्भः** १) शासन आदेश, क्र.प्रतिनि१२२१/प्र.क्र.१२१/२०२१/आ.(वर्ग-१), दि.१३.१०.२०२१
२) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे या कार्यालयाचे आदेश, क्र.MAHA-METRO/HR-P/PM/GM/२०२२/५२५, दि.३१.१०.२०२२
३) श्री. प्रकाश बा. मिसाळ, मु.अ. यांचा प्रतिनियुक्तीवरुन विभागात रुजूसाठीचा अर्ज दि.०२.११.२०२२

**शासन आदेश :**

श्री. प्रकाश बा. मिसाळ, मुख्य अभियंता (स्थापत्य), जलसंपदा विभाग यांची महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे यांच्या आस्थापनेवरील अतिरिक्त मुख्य प्रकल्प व्यवस्थापक, महामेट्रो, पुणे या पदावर त्यांच्या इच्छुकतेच्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ येथील आदेशान्वये प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. श्री.मिसाळ यांना प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होण्याकरिता दि.१३.१०.२०२१ रोजी या विभागातून कार्यमुक्त करण्यात आले होते. आता महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे या कार्यालयाने संदर्भ क्र. २ येथील आदेशान्वये श्री. मिसाळ, मुख्य अभियंता यांना जलसंपदा विभागात रुजू होण्यासाठी प्रतिनियुक्तीच्या पदावरुन दि.३१.१०.२०२२ रोजी कार्यमुक्त केले आहे. श्री. मिसाळ हे प्रतिनियुक्तीवरुन या विभागात दि.०१.११.२०२२ रोजी रुजू झाले आहेत.

२. श्री. मिसाळ, मुख्य अभियंता (स्थापत्य) हे पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असल्याने त्यांची प्रतिनियुक्तीवरुन जलसंपदा विभागात रुजू झाल्यानंतरची पदस्थापना महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील कलम ४(४) च्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारांच्या मान्यतेने खाली दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | सध्याचे पद | प्रतिनियुक्तीवरुन विभागात रुजू झाल्यानंतरच्या पदस्थापनेचे पद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | श्री. प्रकाश बाळकृष्ण मिसाळ. | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत | मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, जलसंपदा विभाग, नाशिक |

३. श्री. प्रकाश बा. मिसाळ, मु.अ. हे नवीन पदावर/पदस्थापनेच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास **doesttclass1.wrd@maharashtra.gov.in** या ई-मेल संकेतस्थळावर त्वरित कळविण्यात यावे.

४. सदर आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून पदस्थापनेबाबतचे आदेश रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन आदेश जलसंपदा विभागाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(उद्धव दहिफळे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. अ.मु.स.(जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव (लाक्षेवि/ प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महासंचालक /सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
५. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
६. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
७. मा. उपमुख्यमंत्री(जलसंपदा) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. संबंधीत अधिकारी.
९. संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१०. सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
११. कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.